## अनंत श्रमे न मिळे ते बापूकृपे जवळी आले...

*- कवितावीरा पटेल, अमेरिका*

---

''बापूंवर विश्वास ठेव. जे काही घडत आहे, किंवा घडत नाही आहे, ते सगळंच चांगल्यासाठी आहे''... हे ह्या श्रद्धावान स्त्रीच्या नवऱ्याचे उद्‌गार खरे ठरतात. त्याचा पासपोर्ट हरवल्यावर, सर्व अडचणींना पार करत, नवीन पासपोर्ट त्याला कसा मिळतो, हे ह्या अनुभवामध्ये वाचायला मिळते.

---

हरि ॐ. सन् २००० पासून मी सद्‌गुरु अनिरुध्द बापूंच्या भक्तीत आहे. अमेरिकेमधील एक प्रायोगिक उपासना केंद्र सध्या आमच्या घरी आहे.

मी व माझे पती असितसिंह पटेल अमेरिकेमध्ये असतो व आमची मुलगी, जाह्नवीवीरा भारतात असते. मुलीला अमेरिकेमधून एक इंटर्व्यु कॉल असल्याने, आम्ही २ फेब्रुवारी २०१५ला तिला घ्यायला भारतात जाणार होतो. भारतात जायची जवळजवळ सगळी तयारी झालेली होती. माझी खरेदी व इतर महत्त्वाची कामेही पार पडली होती. भारतात गेल्यावर असितसिंहला मुलीबरोबर यु.एस. एम्बसीमध्ये जायचे होते. आमची भारतात जाण्यासाठीची तिकिटेही आलेली होती. आम्ही अमेरिकेहून १ फेब्रुवारीला निघणार होतो. ३० जानेवारीपर्यंत असितसिंह त्यांच्या ऑफिसच्या कामातच खूप व्यस्त होते. त्यांना कामानिमित्त सतत कुठे ना कुठे प्रवास करायला लागायचा. एक आठवडा सॅन फ्रॅन्सिस्को, तर कधी न्युयॉर्क, असा सततचा त्यांचा प्रवास सुरुच होता.

भारतात जायच्या एक आठवडा अगोदर ते सॅन फ्रॅन्सिस्कोला कामानिमित्त मित्राबरोबर गेले होते. ते काम झाल्यावर समोरच्याच एका मोबाईलच्या दुकानात जायचे असल्याने, त्यांनी त्यांचे सर्व सामान बॅगेत ठेवले आणि बॅग गाडीत सीटच्या खाली ठेवली. त्यांनी गाडी पार्किंगमध्ये पार्क केली होती. तो रस्ता चांगलाच रहदारीचा होता. माझे पती आणि त्यांचे मित्र दुकानातून अगदी दहा मिनिटांतच बाहेर आले. गाडीत बसताच, कोणीतरी काच फोडून सीट खालची बॅग चोरल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्या बॅगेत त्यांच्या कंपनीचे खूप महत्त्वाचे सामान व मुख्य म्हणजे त्यांचा पासपोर्टही होता. त्यांचा स्वत:चा खाजगी फोन त्यांच्या बरोबरच असल्याने त्यांनी लगेचच गाडीचे फोटो काढले आणि ते त्यांच्या कंपनीमध्ये पाठवले. रात्रीचे दहा वाजल्याने पोलिसांकडे गेल्यावर, त्यांनी पतींचे नाव व फोन क्रमांक घेऊन ठेवला. ''ही काही इतकी मोठी केस नव्हे...'' असे म्हणून, ''काही हाती सापडले तर तुम्हाला फोन करू'' असे सांगितले.

एका आठवड्याने आम्हाला भारतात जायचे होते आणि पतींचा पासपोर्टच चोरीला गेलेला होता. एका आठवड्यात नवीन पासपोर्ट मिळेल असे प्रथम त्यांना पासपोर्टच्या कार्यालयातून सांगण्यात आले. बॅगेतून ऑफिसचे मोबाईल चोरीला गेल्याने, त्यांचा पुढचा प्रवास रद्द झाला व ते घरी आले. काही दिवसांनी माझे पती नवीन पासपोर्टची चौकशी करण्यास गेले असता, त्यांना एक वेगळीच धक्कादायक गोष्ट कळली. त्यांना पासपोर्ट ऑफिसमधून असे सांगण्यात आले की त्यांच्या आधीच्या पासपोर्टवर काही निर्बंध होते व त्यामुळे कमीतकमी ३० दिवसांनंतर त्यांना नवीन पासपोर्ट मिळेल. पण नक्की नवीन पासपोर्ट कधी तयार होईल सांगता येत नव्हते. अर्थात त्यामुळे असितसिंहना लगेच भारतात जाणे अशक्यच होते.

त्यांनी घरी येऊन मला सर्व काही सांगितले व भारतात तुला एकटेच जावे लागेल असेही ते म्हणाले. आमचा दोघांचाही विरस झाला. इतका लांबचा प्रवास मी एकटीने कधीच केलेला नव्हता. त्यात असितसिंहना जाह्नवी बरोबर भारतातील यु.एस. एम्बसीमध्येही जायचे होते. मी त्यांना म्हटले, ''इतकी मोठी ट्रिप आहे व मला तर काहीच माहित नाही. मी एकटी कशी जाणार?'' त्यावर ते मला म्हणाले, ''मी काहीही करू शकत नाही. पण माझा बापूंवर विश्वास आहे. कदाचित बापूंकरिता माझी इथे जास्त गरज असेल.

मला पूर्ण विश्वास आहे की ते जे करतील ते सगळं नीटच करतील''. ते मला सतत म्हणत होते की चांगले विचार कर, पण एक सामान्य माणूस म्हणून मला थोडीफार काळजी वाटणं सहाजिकच होतं.

असितसिंहनी मग फेडरल ऑफिसमध्ये फोन करून, त्यांचे नवीन पासपोर्ट मिळण्याचे काम स्थगित झाल्याचे कळवले. 'माझे इतर सर्व रेकॉर्ड चांगले असल्याने, मला नवीन पासपॉर्ट लवकर मिळवून द्या' अशी त्यांनी विनंती केली. पण असितसिंहनी फोन केला तेव्हा नेमके त्यावेळी तिथे फेडरल ऑफिसमध्ये संबंधित कर्मचारी उपस्थित नव्हते. म्हणून तिथल्या पद्धतीप्रमाणे, असितसिंहची विनंती तिथल्या फोन सिस्टिमवर रेकॉर्ड झाली. त्याचे उत्तर खरंतर ४८ तासांनी मिळते. त्यामुळे आता आशा अजून धुसर व्हायला लागली. मला माझ्या पतीने सांगितले, ''आता कितीही प्रयत्न केला तरी काहीही होऊ शकत नाही. तुला एकटीलाच जायचे आहे. बापूंवर विश्वास ठेव. जे काही घडत आहे, किंवा घडत नाही आहे, ते सगळंच चांगल्यासाठी आहे''. मी त्यांना नुसतेच ''हो'' म्हणत होते, पण मनातून मी खूपच दु:खी होते. मलाही माहित होते की नियमांप्रमाणे ह्यातून काहीही निष्पन्न होऊ शकत नाही.

मी अगोदर म्हटल्याप्रमाणे अशा केसेसमध्ये ४८ तासांनी उत्तर मिळते. पण फक्त १२ तासातच फेडरल ऑफिसमधून एका महिला कर्मचारीचा फोन आला. त्या म्हणाल्या, ''तुमच्या सतत काही वर्षांच्या चांगल्या रिपोर्टस्मुळे तुमच्यावरील सर्व निर्बंध काढून टाकण्यात येत आहेत. तेव्हा आता उद्याच जाऊन तुम्ही तुमचा नवीन पासपोर्ट घेऊन या''.

मी ऑफिसमध्ये असताना असितसिंहनी मला फोनवर हे सांगितले. इतकी मोठी समस्या इतक्या लवकर सुटू शकते ह्यावर माझा विश्वासच बसेना. ह्या अगोदर आम्ही असितसिंहच्या एका बापूभक्त मित्राला घडलेला प्रकार सांगितला होता. ते आम्हाला म्हणाले होते, ''तुम्ही तिकिट रद्द करू नका. बापू काहीही करू शकतात''. काम झाल्यावर मला आठवले की तेव्हा माझ्या तोंडून एक वाक्य निघाले होते, ''अशा सरकारी कामांमध्ये चमत्कार होऊच शकत नाहीत. तेव्हा पासपोर्ट मिळण्याची शक्यता वाटत नाही''. मला खूण पटली होती की बापूंकडे आल्यावर काहीही होऊ शकतं. असितसिंहचा व त्यांच्या मित्राचा विश्वास खरा ठरला होता.

आमच्या जीवनातील अशक्यप्राय गोष्ट बापूंनी शक्य केली होती. खरंच अगदी दुसऱ्याच दिवशी तो नवीन पासपोर्ट माझ्या नवऱ्याच्या हातात होता. ज्या गोष्टीकरता ३० दिवस लागणार होते, ते काम बापूकृपेने काही तासांमध्ये झालेले होते. परत व्हिजासाठी कमीत कमी ४ दिवस लागतात. असितसिंहनी तिथेही अर्ज केला व चार दिवसांचे काम केवळ काही तासांतच झाले. आम्ही सकाळी ६।।ला नाश्ता करत असताना असितसिंहनी सहजच ई-मेल बघितला. तर त्यात व्हिजा मिळाल्याचा ई-मेल आला होता. ई-मेलमध्ये हे ही म्हटले होते की 'तुम्ही २९ जानेवारीपासून कधीही प्रवास करू शकता'.

आम्हाला खूपच आनंद झाला होता. मला असितसिंह सारखे सांगत होते, ''माझा बापूंवर पूर्ण विश्वास आहे, आणि तुझा विश्वास मात्र डगमगतो आहे. बापूंवर विश्वास ठेव''. खरंच त्यांच्या ह्या विश्वासामुळेच सगळे चांगले घडून आले. बापूंमुळेच आम्ही दोघे भारतात जाऊ शकलो हे मात्र नक्की. मी अंबज्ञ आहे.

हरि ॐ श्रीराम अंबज्ञ
नाथसंविध्